प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)

रविवार, दिनांक : ३० जून, २०२४

ठळक बातम्या

1. तिसऱ्यांदा पंतप्रधान बनल्यानंतर आज पहिल्यांदाच नरेंद्र मोदी यांनी आकाशवाणीवरील 'मन कि बात' द्वारे देशातील जनतेशी साधला संवाद.
2. 'उद्यापासून लागू होणाऱ्या नवीन फौजदारी कायद्यांचा भर, वसाहतवादी कायद्यांच्या 'शिक्षा' या तत्वाविरूद्ध 'न्याय' या तत्वावर आहे'- कायदा आणि न्याय राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांचं प्रतिपादन.
3. महाराष्ट्राच्या पहिल्या महिला मुख्य सचिव म्हणून सुजाता सौनिक यांनी आज स्वीकारला कार्यभार.
4. तब्बल १७ वर्षांनी टी-20 विश्वचषक जिंकल्यानंतर कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली टी-20 क्रिकेट मधून निवृत्त.

######

'मन कि बात'

फेब्रुवारी नंतर आज पहिल्यांदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आकाशवाणीवरील 'मन कि बात' द्वारे देशातील जनतेशी संवाद साधला. लोकसभा निवडणुकीनंतर पहिल्यांदाच हा कार्यक्रम प्रसारित करण्यात आला. यावेळी देशवासीयांनी आपली राज्यघटना आणि देशाच्या लोकशाही व्यवस्थेवर दाखवलेल्या अढळ विश्वासासाठी पंतप्रधानांनी जनतेचे आभार मानले. पंतप्रधान म्हणाले कि २०२४ ची निवडणूक ही जगातील सर्वात मोठी निवडणूक होती. एवढी मोठी निवडणूक जगातील कोणत्याही देशात झाली नाही, ज्यात 65 कोटी लोकांनी मतदान केलं. यासाठी त्यांनी निवडणूक आयोगाचं आणि मतदान प्रक्रियेशी संबंधित सर्वांचं अभिनंदन केलं. आज ‘हूल दिवस’ आहे. इंग्रजांच्या अत्याचाराला कडाडून विरोध करणाऱ्या शूर आदिवासी सिद्धो-कान्हूंच्या अदम्य धैर्याशी आजचा हा दिवस निगडीत आहे. यानिमित्त पंतप्रधानांनी शूर सिद्धो-कान्हूं आणि हजारो संथाली कॉम्रेड्सच्या शौर्याला उजाळा दिला.

'मन कि बात' चा आज एकशे अकरावा भाग आकाशवाणीवरून प्रसारित झाला. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सुरू करण्यात आलेल्या - 'एक पेड माँ के नाम' या मोहिमेचं पंतप्रधानांनी कौतुक केलं आणि सर्व देशवासियांना,तसंच जगातील सर्व देशांतील लोकांना, आपल्या आईसोबत किंवा तिच्या नावाने एक झाड लावण्याचं आवाहन केलं आहे.

त्याचप्रमाणे त्यांनी केरळमधील अट्टापडी इथं आदिवासी भगिणींद्वारे तयार करण्यात येणाऱ्या कार्थुम्बी छत्र्यांचं कौतुक केलं . आंध्र प्रदेशातील अल्लुरी सीताराम राजू जिल्ह्यातील अराकू कॉफीबद्दलही त्यांनी माहिती दिली ज्याच्या उत्पादन आणि प्रसारासाठी गिरीजन सहकारी संस्थेची महत्वाची भूमिका आहे. अराकू कॉफिच्या लागवडीत सुमारे दीड लाख आदिवासी कुटुंबे जोडली गेलेली असून कोंडा डोरा आदिवासी समुदायाला देखील याचा मोठा फायदा झाला असल्याचं नरेंद्र मोदी यांनी सांगितलं.

जगभरात योग दिन वेगवेगळ्या प्रकारे साजरा केला गेला त्याचं कौतुक पंतप्रधानांनी केलं असून योग्य एक दिवसासाठी नसून ती आपली जीवनशैली बनावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. त्याचप्रमाणे पुढील महिन्यात आयोजित पॅरिस ऑलिम्पिकसाठी त्यांनी भारतीय खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. आज आकाशवाणीच्या संस्कृत वार्तापत्राचे प्रसारण सुरू झाल्याला 50 वर्षे पूर्ण झाली आहे. ह्या वार्तापत्राने 50 वर्षांपासून कितीतरी लोकांना संस्कृतशी जोडून ठेवलं असल्याचं सांगून त्यानिमित्त मोदींनी आकाशवाणी परिवाराचं अभिनंदन केलं आहे. तसंच पंढरपूरच्या आषाढी यात्रेच्या सर्व भाविकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

नवे फौजदारी कायदे

'उद्यापासून लागू होणाऱ्या नवीन फौजदारी कायद्यांचा भर, वसाहतवादी कायद्यांच्या 'शिक्षा' या तत्वाविरूद्ध 'न्याय' या तत्वावर आहे' असं प्रतिपादन कायदा आणि न्याय राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी केलं. भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरी संरक्षण संहिता, आणि भारतीय साक्ष्य अधिनियम, हे नवे फौजदारी कायदे उद्यापासून देशभरात लागू होणार आहेत. नवीन कायद्यांबाबत न्यायाधीश, वकील यांच्यासह सर्व संबंधितांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीनं विधी आणि न्याय मंत्रालयाच्या विधी कार्य विभागातर्फे मुंबईत आज आयोजित एका परिषदेचं उद्घाटन अर्जुन राम मेघवाल यांनी केलं. त्यावेळी ते बोलत होते. हे नवे कायदे, विधिज्ञ , शैक्षणिक आणि सामान्य लोकांसह संबंधितांशी व्यापक सल्लामसलत केल्यानंतर तयार करण्यात आले आहेत असंही मेघवाल म्हणाले.

महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महाराष्ट्राचे विधी आणि न्यायव्यवस्था मंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबई, गुजरात, पंजाब या उच्च न्यायालयांचे मुख्य न्यायमूर्ती, यांनी या तीन नवीन कायद्यांवर प्रकाश टाकला.

पंढरीची पालखी

आळंदीच्या गांधीवाडा इथं काल मुक्काम घेतल्यानंतर संत ज्ञानेश्वर माउलीं ची पालखी आज पुण्याच्या दिशेने मार्गस्थ झाली असून दुपारी संगमवाडीत माऊलींची पालखी दाखल

झाली. पुण्यातील भवानी पेठ इथं पालखीचा रात्रीचा मुक्काम असणार आहे. तर संत तुकाराम महाराजांची पालखी पुण्यातील नाना पेठेतील विठोबा मंदिर इथं मुक्कामी असेल. २ जुलैपर्यंत वारकऱ्यांच्या मुक्काम ठिकाणी तब्बल ७५० कर्मचारी तीन शिफ्टमध्ये स्वच्छतेसाठी तैनात करण्यात येणार आहेत. पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या वारकऱ्यांसाठी सुमारे १,६९५ मोबाइल टॉयलेट शहराच्या वेगवेगळ्या भागांत उपलब्ध करून देण्यात आले आहे. दरम्यान आषाढी वारीत वारकऱ्यांच्या प्रबोधनासह शासकीय योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्याच्या सांस्कृतिक विभागाचे दोन चित्ररथ वारीत सहभागी होत आहेत. या उपक्रमाचा प्रारंभ मुंबई इथं सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते करण्यात आला. आस्था- अस्मितेचं प्रतिक असलेल्या पंढरपूर वारीला वैशिष्ट्यपूर्ण अध्यात्मिक वारी म्हणून जागतिक नामांकन मिळण्यासाठी युनेस्कोकडे प्रस्ताव पाठविणार असल्याचं मुनगंटीवार यावेळी म्हणाले.

भंडारा अपघात / डॉ नीलम गोरे

आज साकोली येथील उड्डाणपुलावर रायपूरवरून नागपूरच्या दिशेने जात असलेली कार अनियंत्रित होऊन उड्डाणपुलाच्या दुभाजकाला धडकल्याने झालेल्या अपघातात वृद्ध आई आणि मुलाचा मृत्यू झाला आहे. तर एकजण जखमी झाला आहे. हे सर्वजण कौटुंबिक समारंभासाठी नागपूरला चालले होते. तर काल समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातात ७ जण मृत्युमुखी पडले. दरम्यान राज्यात विशेषतः मोठ्या महानगरांमध्ये रस्ते अपघाताचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे. रस्ते अपघातांचे प्रमाण रोखण्यासाठी पोलिस विभाग आणि परिवहन विभाग यांनी सायंकाळी सहा ते रात्री बारा वाजेपर्यंत संयुक्तपणे तपासणी मोहीम राबवावी. असे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दिले आहे.

विधानभवनात काल दूरदृष्य संवाद प्रणालीद्वारे ड्रंक आणि ड्राईव्ह रस्ता सुरक्षा याबाबत बैठक घेण्यात आली. त्यावेळी डॉ. गोऱ्हे बोलत होत्या.

रस्ते अपघाताची संख्या लक्षणीयरीत्या कमी करण्यासाठी त्याचे सूक्ष्म नियोजन करतानाच मद्यपाशन करून वाहन चालविणाऱ्यांवर तत्काळ कारवाई करावी. विशेषत: मोठमोठ्या शहरालगतच्या ग्रामीण भागात अवैध दारू दुकान, अवैध धाबे यांच्यावर तसंच अल्पवयीन वाहन चालकांवरही नियमाप्रमाणे कारवाई करावी असे निर्देश गोरे यांनी दिले.

राज्यमंत्री प्रतापराव जाधव

बुलढाणा शहरात आज केंद्रीय आयुष(स्वतंत्र प्रभार)तथा आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचा नागरी सत्कार सोहळा संपन्न झाला. यावेळी शहरातून त्यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली.

सचिव सुजाता सौनिक

अतिरिक्त मुख्य गृह सचिव सुजाता सौनिक यांची महाराष्ट्राच्या मुख्य सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. 1987 च्या बॅचच्या आयएएस अधिकारी, असलेल्या सुजाता सौनिक जून 2025 मध्ये निवृत्त होणार आहेत. त्यांनी आज माजी मुख्य सचिव नितीन करीर यांच्याकडून पदभार स्वीकारला.

सुजाता सौनिक या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला मुख्य सचिव आहेत. सुजाता सौनिक यांना प्रशासनातील आरोग्य सेवा, वित्त, शिक्षण, आपदा व्यवस्थापन इत्यादी क्षेत्रात तीन दशकांचा अनुभव आहे.

**भारतीय संघ कौतुक**

काल टी - २० विश्वचषक अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा ७ धावांनी पराभव करत भारतानं विजेतेपदाला गवसणी घातली. संपूर्ण भारतातून संघावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. तब्बल १७ वर्षांनी ट्वेन्टी-20 विश्वचषक जिंकल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भारतीय संघाचं फोनवरून अभिनंदन केलं तसंच समाजमाध्यमवरील संदेशात 'आम्हाला भारतीय संघाच्या या कामगिरीचा गर्व आहे. भारतीय संघाने देशातील प्रत्येक गावगल्लीतील लोकांची मनं जिंकली आहेत. संपूर्ण विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने एकही सामना हारला नाही, ही उल्लेखनीय गोष्ट आहे.' असं मोदी म्हणाले.

तर 'आम्हाला तुमचा अभिमान वाटतो' या शब्दांत राष्ट्रपती दौपदी मुर्मू यांनी भारतीय क्रिकेट संघाचं कौतुक केलं आहे.

सूर्य कुमार यादव, रोहित शर्मा आणि राहुल द्रविड यांचा विशेष उल्लेख करत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भारतीय क्रिकेट संघावर कौतुकाचा वर्षाव केला आहे.

**रोहित शर्मा आणि विराट कोहली**

कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या कामगिरीमुळे तब्बल १७ वर्षांचा दुष्काळ संपवत भारतीय संघाने टी-20 विश्वचषकाला गवसणी घातली. या ऐतिहासिक विजयानंतर दोन्ही दिग्गज खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय टी-20 क्रिकेटमधून आपली निवृत्ती जाहीर केली आहे.

'संघाला सर्वात जास्त गरज असताना मी कामगिरी करू शकलो याबद्दल मी आभारी आहे, असं विराट कोहली यावेळी म्हणाला. तर ‘2007 साली याच फॉरमॅटमधून आपण करिअरची सुरूवात केली आणि वर्ल्ड कप जिंकला होता. आता गुड बाय करायला यापेक्षा

चांगली वेळ असू शकत नाही.' असं म्हणत कर्णधार रोहित शर्माने देखील टी २० क्रिकेट मधून आपली निवृत्ती जाहीर केली आहे. 'माझ्याकडे शब्द नाहीत. माझ्यासाठी हा खूप भावनिक क्षण आहे, मला कोणत्याही किंमतीत आयसीसी ट्रॉफी जिंकायची होती. आम्ही शेवटी ते केले याचा आनंद आहे.' असं रोहित शर्मा म्हणाला. त्याचप्रमाणे राहुल द्रविड यांचा भारताचे प्रशिक्षक म्हणून हा अखेरचा सामना होता. त्यामुळे हे विश्वविजेतेपद या तिघांसाठी सन्माननीय निरोप ठरला आहे.

**हवामान**

हवामान ! मागील २४ तासात विदर्भात अमरावती आणि गडचिरोली वगळता बहुतेक जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरी लावली. यवतमाळ मध्ये सर्वात जास्त ५६ मिलीमिटर पावसाची नोंद झाली. पुढील ५ दिवस विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळाची तर काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता असून सतर्कतेचा yellow alert जारी करण्यात आला आहे. दरम्यान, आज नागपुरात काही ठिकाणी रिमझिम पावसाची नोंद झाली.

#####